**प्रेस नोट** **दि.१०/०४/२०१९**

---

## खडक पोस्टे तपास पथकाची कामगिरी

## खुनाच्या प्रयत्नातील विशाल ऊर्फ जंगळया सातपुते टोळीतील फरार असलेला सराईत गुन्हेगार जेरबंद

सदर बाबत अधिक माहिती अशी की, सुमार दिड वर्षापुर्वी अंजिक्य शिंदे रा.५४ एच पी लोहीयानगर पुणे याची इसम नामे करण पवार, यश लोंढे व राहुल खवळे, विकास कांबळे यांचे बरोबर मामडी चौक लोहीयानगर येथे जोरदार भांडणे झाली होती, त्यामध्ये अंजिक्य शिंदे याचा हात तोडला होता त्याबाबत खडक पोलीस स्टेशनला करण पवार, यश लोंढे, राहुल खवळे, विकास कांबळे याचेवर खडक पोलीस स्टेशनला खुनाचा प्रयत्नाबाबत गुन्हा दाखल असुन त्यात त्यांना अटक होवुन ते सध्या जामीनावर खुले आहे.

दिनांक २७/५/२०१८ रोजी रात्रौ ११/१५ वा सुमा. फिर्यादी विकास गोविंद कांबळे रा.५४ एच पी लोहीयानगर पुणे हे सारसबाग चौपाटी पुणे येथे पाव भाजी खाण्यासाठी गेले असता, काहीवेळातच फिर्यादी यांचे ओळखीचे शेजारी ९ नंबर पी एम सी कॉलनीतील राहणारे आरोपी अंजिक्य शिंदे, दत्ता चव्हाण, प्रसाद शिंदे, केदार शिंदे, विकास मांढरे, मंदार खंडागळे, केदार खंडागळे, बाबा कसबे, साहिल सय्यद, सुरज अडागळे, अमित ऊर्फ अंबई वाघमारे असे सर्व टु व्हिलरवर येवुन त्याचे हातामधील कोयते, पालघन, लोखंडी गज, तलवारी अशा हत्याराने फिर्यादी विकास गोविंद कांबळे यास ठार मारण्याचे इराद्याने वरील सर्वांनी मिळुन त्याचे डोक्यावर, हातावर वार करुन ते सदर ठिकाणी दहशत माजवुन तेथील पळुन गेले होते त्याबाबत स्वारगेट पोलीसा स्टेशनला वरील सर्वांचे विरुध्द दंगल माजविणे, खुनाचा प्रयत्न करणे आदीबाबत गुन्हा दाखल झाला होता. त्या गुन्हयात वरील आरोपींना अटक झाली होती परंतु प्रसाद सुरेश शिंदे हा गेली १ वर्षापासुन फरार झालेला होता.

प्रसाद सुरेश शिंदे रा.लोहीयानगर पुणे या पाहिजे आरोपीचा शोध घेण्यासाठी स्वारगेट पोलीस स्टेशन, गुन्हेशाखा इत्यादी पोलीसांनी आहोरात्र शोध घेतला होता परंतु त्याबाबत त्यांना काहीएक सुगावा लागला नाही. सदर आरोपीचा ठावठिकाण्याबाबत खडक पोलीस स्टेशनकडील पोलीस कॉन्स्टेबल आशिष चव्हाण व पोकॉ प्रमोद नेवसे यांना त्यांचे बातमीदाराने बातमी दिली की, प्रसाद सुरेश शिंदे हा आपले अस्तिव बदलुन राम मंदीराजवळ कोंढवा पुणे येथे राहत आहे, त्याप्रमाणे सदरची बातमी मा.श्री राजेन्द्र मोकाशी वरिष्ठ पोलीस निरीक्षक खडक पोलीस स्टेशन पुणे यांना कळवुन त्याचे मार्गदर्शनाखालील राम मंदीर कोंढवा पुणे येथे राहते ठिकाणी सापळा लावला, आरोपी राहत असलेला घराचा दरवाजा वाजवला असता, आम्ही ओळखत असलेला गुन्हेगार प्रसाद सुरेश शिंदे हा आम्हाला पाहताच घरातील खिडकी वाटे पळुन जावुन लागल्याने त्यास स्टाफचे मदतीने थोडयाचा अंतरावर पाठलाग करुन पकडले. त्याचेकडे वरील गुन्हयाचे संदर्भात तपास करता त्याने दाखल गुन्हयात आपला सहभाग असल्याचे सांगितले आहे.

प्रसाद सुरेश शिंदे वय ३० वर्षे रा.५४ एच पी लोहीयानगर पुणे हा कै.कुणाल पोळ रा.स्वागरेट पोलीस वसाहत पुणे याचे खुन्याचे गुन्हयातील सध्या येरवडा कारागृहात असणारा सराईत गुन्हेगार विशाल ऊर्फ जंगळया सातपुते रा. ९ नंबर पी एम सी कॉलनी घोरपडे पेठ पुणे याचा साथीदार आहे. प्रसाद सुरेश शिंदे याचेवर यापुर्वी खडक पोलीस स्टेशन येथे खुनाचा प्रयत्न, विनयभंग करणे, चोरी करणे, हत्यारानीशी मारामारी करणे इत्यादी गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत.

वर नमुद सर्व कारवाई ही श्री रविंद्र सेनगावकर, अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग पुणे, श्री.सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ १ व श्री. प्रदिप आफळे,सहा पोलीस आयुक्त फरासखाना विभाग यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशन चे श्री.राजेन्द्र मोकाशी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.उत्तमर चक्रे पोलीस निरीक्षक (गुन्हे) तपास पथकाचे प्रभारी सहा पोलीस निरीक्षक श्री.उमाजी राठोड, पोलीस कर्मचारी विठ्ठल पाटील, विनोद जाधव, संदिप पाटील, आशिष चव्हाण, प्रमोद नेवसे, समीर माळवदकर, बंटी कांबळे, राकेश क्षिरसागर,रवी लोखंडे, महावीर दावणे, इम्रान नदाफ, योगेश जाधव, विशाल जाधव, हिम्मत होळकर, यांचे पथकाने केली.